<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३६/२०१७</u>

CNR No. MHSO060002342017

श्रीधर आटकळे

वि.

जिल्हाधिकारी, सोलापूर वगैरे

## आदेश निशाणी क्र. २९, ३१ आणि १ वर

दावा प्रलंबित असताना वादी श्रीधर श्रीमंत आटकळे हे दि. २५/११/२०१९ रोजी मयत झाले. त्यांचे वारस यांना दाव्याबाबत माहिती नव्हती. घरामध्ये वादी हे कर्ते होते. प्रकरणाचे कामकाज तेच पहात होते. त्यांचे वारस हे विभक्त रहात होते. त्यामुळे त्यांना प्रकरणाची माहिती झाली नाही. त्यामुळे झालेला उशीर माफ करुन प्रकरणात वादी यांचे नाव कमी करुन त्या ऐवजी त्रयस्थ अर्जदार यांचे नाव मयत वादी यांचे वारस म्हणून दावा निशाणी क्र. १ मध्ये समाविष्ट करावे व त्यानुसार दावा निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी हे अर्ज देण्यात आले आहेत.

०२. त्यावर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. अर्जातील कथने खरी वाटत नाहीत. एक वर्ष सहा महिने अकरा दिवस झालेल्या विलंबाबाबत योग्य स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

०३. रेकॉर्डवर वादी श्रीधर श्रीमंत आटकळे यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करण्यात आले आहे. त्यानुसार ते दिनांक २५/११/२०१९ रोजी मयत झाले आहेत. त्रयस्थ इसम हे मयत वादी यांचे वारस म्हणजे पत्नी व मुलगा आहेत. हा दावा जाहीर घोषणा व निरंतर मनाई हुकूमासाठीचा आहे. प्रतिवादी यांनी वादी यांना नोटीस देऊन गौण खनीज दंड रक्कम रु. ४,१७,८४०/- जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर रकमेची वसुली वादी यांच्या मालमत्तेतून होऊ शकते. त्यामुळे मयत वादी यांचे वारस या नात्याने त्रयस्थ इसम यांना हा दावा पुढे चालवण्याचा हक्क व अधिकार निर्माण झाला आहे.

०४. प्रकरणाचा गुणदोषावर अंतिम व योग्य न्यायनिर्णय होण्यासाठी झालेला उशीर माफ करुन मयत वादी श्रीधर आटकळे यांचे नाव वगळणे व त्यांचे वारसांचे नाव रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य राहील. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. झालेला उशीर माफ करुन मयत वादी यांचे वारस यांचे नाव रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी त्याप्रमाणे दावा निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्ती करावी.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.08.01 17:53:01 +0530

दि. ०१/०८/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 01/08/2022 |
| Order uploaded on | : | 02/08/2022 |